# सभेचा कार्यवृत्तांत

सोलापूर विद्यापीठाच्या **व्यवस्थापन परिषदेची सभा सोमवार दि.९/१०/०६ रोजी दुपारी १-०० वा.** विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाच्या दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात झाली. या सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. डॉ. इरेश स्वामी - कुलगुरु. | अध्यक्ष |
| २) | श्रीमती डॉ. व्ही. जे. नाईकनवरे. | सदस्य |
| ३) | ॲड. रामदास पी. सब्बन | सदस्य |
| ४) | डॉ. एल. पी. देशमुख | सदस्य |
| ५) | डॉ. आर. आर. पाटील, संचालक म. व. वि. वि. मं. - पदसिध्द | सदस्य |
| ६) | प्राचार्य जे. के. बिले | सदस्य |
| ७) | डॉ. सी. बी. कोळेकर | सदस्य |
| ८) | डॉ. पी. जी. मोरे | सदस्य |
| ९) | श्री. एन. बी. पवार | सदस्य |
| १०) | श्रीमती एन. व्ही. साठे | सदस्य |
| ११) | श्री. पी. एम. हिरेमठ | सदस्य |
| १२) | श्री. व्ही. तिरुपती | सदस्य |
| १३) | प्राचार्य बी. पी. रोंगे | सदस्य |
| १४) | डॉ. डी. डी. रणनवरे | सदस्य |
| १५) | मा. जयसिंह मोहिते-पाटील | सदस्य |
| १६) | श्रीमती मिनाक्षी सुभाष कदम | सदस्य |
| १७) | डॉ. एम. एस. शेजूळ - परीक्षा नियंत्रक | स्थायी निमंत्रित |
| १८) | श्री. एम. के. कौरथी - वित्त व लेखा अधिकारी | स्थायी निमंत्रित |
| १९) | डॉ. पी. बी. कुंभार - कुलसचिव | सचिव |

सभेच्या सुरुवातीला सचिव यांनी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे स्वागत केले. यानंतर सभेच्या कामकाजास सुरुवात झाली.

व्ही. तिरुपती यांच्या मातोश्रीचे दि. २६ सप्टेंबर, २००६ रोजी दुःखद निधन झाल्याने सभागृहाने दोन मिनिटे स्तब्ध राहून श्रध्दांजली वाहिली.

सभेतील विषयांवर खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

**विषय क्र. [ १ ]** **दि. ५ जुलै २००६ व दि. २९ सप्टेंबर २००६ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव क्र. [ १ ]** **दि. ५ जुलै २००६ व दि. २९ सप्टेंबर २००६ रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्त्यांसह वाचून कायम करण्यात आला.**

**१) सभेचा कार्यृत्तांतामधील चर्चा वगळावी असे ठरले.**

**३) पान क्र. ११ वर,**

**आयत्या वेळेचे विषय क्र. १ - परीक्षा नियंत्रक आणि वित्त व लेखा अधिकारी यांच्या नेमणूकीबाबत..**

**ठराव क्र. १ - परीक्षा नियंत्रक पदाकरिता वर्तमानपत्रामध्ये जाहिरात द्यावी आणि वित्त व लेखा अधिकारी पदावर अधिकारी शासनाकडून प्रनिनियुक्तीवर घेण्याकरिता शासनाकडे पाठपुरावा करावा.**

**आयत्या वेळेचे विषय क्र. २ - शासन स्तरावर प्रलंबित प्रश्नासंदर्भात शासनाशी पत्रव्यवहार व पाठपुरावा करण्यासाठी समिती नियुक्त करण्याबाबत.**

**ठराव क्र. २ - शासनस्तरावर प्रलंबित प्रश्नासंदर्भात शासनाशी पत्रव्यवहार व पाठपुरावा करण्यासाठी प्राचार्य जे. के. बिले आणि ॲडव्होकेट रामदास सब्बन यांची समिती नियुक्त करण्यात आली.**

**[कृ.मा.प.]**

३) प्राचार्य बी. पी. रोंगे यांनी दि.५/७/०६ रोजी सभेस गैरहजर रहाण्याबाबत मा.कुलगुरु यांची परवानगी घेतली होती. त्यानुसार त्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.

४) दि. २९ सप्टेंबर ऐवजी दि. २९ ऑगस्ट २००६ अशी दुरुस्ती करण्यात आली.

**विषय क्र. [ २ ] महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २७ (x) नुसार मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल.**

**ठराव क्र. [ २ ] महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांनी दि.२ जून ते दि.८ सप्टेंबर २००६ पर्यंतचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर केला. व्यवस्थापन परिषदेने मा.कुलगुरु यांच्या अहवालाची नोंद घेतली.**

**विषय क्र. [ ३ ] सोलापूर विद्यापीठातंर्गत कार्यरत असलेल्या अतिथीगृहामध्ये निवासासाठी येणाऱ्या अभ्यागतांना आकारल्या जाणाऱ्या दरांमध्ये सुधारणा करण्याबाबत.**

सध्या शिवाजी विद्यापीठाचे परिपत्रक जा. क्र. आस्थापना/११४७ दि. १८/३/९६ प्रमाणे खालीलप्रमाणे दर आकारले जातात ( सोबत प्रत).

३) विद्यापीठ कामासाठी प्रति दिवस रु. १५/-

४) विद्यापीठ प्राध्यापक कर्मचारी खाजगी कामासाठी रु. ५०/-

सदरचे दर खूप जुने असल्यामुळे व महानगरपालिका कर, वीजबिल, पाणीपट्टीचे दर इ. मध्ये भरमसाठ वाढ झालेली असल्याने सदरचे दर सुधारीत करणे आवश्यक आहे.

३) विद्यापीठ कामासाठी प्रति दिवस रु. २५/-

४) विद्यापीठ अध्यापक/अधिकारी/कर्मचारी खाजगी कामासाठी प्रति दिवस रु.६०/-

उपरोक्त दरांना निश्चित करण्याचा अधिकार व्यवस्थापन परिषदेस महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८ (v) नुसार असल्याने सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. [ ३ ] क्र. २ - विद्यापीठ अध्यापक/अधिकारी/कर्मचारी याबरोबरच संलग्नित महाविद्यालयातील अधिकारी/कर्मचारी, विद्यापीठ अधिकार मंडळावरील सदस्य यांना खाजगी कामासाठी प्रति दिवस रु.६०/- अशी दुरुस्ती करुन सुधारीत दरांना मान्यता दिली.**

**वित्त व लेखा अधिकारी श्री. कौरथी व मानसेवी कर्मचारी श्री. जयवंत स्वामी हे सध्या अतिथीगृहात रहात आहेत. त्यांना त्यांची स्वतंत्रपणे रहाण्याची व्यवस्था करावी आणि अतिथीगृहामधील खोल्या खाली कराव्यात असे प्रशासनाने आदेश द्यावेत, तसेच अतिथीगृहात ज्या दिवसापासून रहातात तेव्हापासूनचे भाडे घरभाडे भत्याप्रमाणे वसूल करावे असे सर्वानुमते ठरले.**

**विषय क्र. [ ४ ] सोलापूर विद्यापीठाच्या परिसराला "ज्ञानगंगोत्री" हे नांव सुचविल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

व्यवस्थापन परिषदेच्या दि. ५ जुलै २००६ रोजी झालेल्या सभेमधील विषय क्र. ७ वरील झालेल्या ठरावानुसार, विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांकडून सोलापूर विद्यापीठाच्या परिसराला नांव सुचविण्याबाबत सूचना मागविण्यात आलेल्या होत्या. व्यवस्थापन परिषदेचे व विद्यापरिषदेच्या प्रत्येकी दोन सदस्यांकडून याबाबत सूचना प्राप्त झालेल्या असून त्या सोबत जोडल्या आहेत. सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**[कृ.मा.प.]**

**ठराव क्र. [ ४ ]** **सोलापूर विद्यापीठाच्या परिसराला नांव सुचविण्याबाबत पुन्हा व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, विद्यापरिषदेचे सदस्य आणि प्राचार्य यांना पत्रे पाठवून त्यांच्याकडून सूचना मागवून घ्याव्यात आणि हा विषय पुढील सभेत सादर करावा.**

**विषय क्र. [ ५ ]** **मानसेवी लेखनिक श्री. एस. आर. लोखंडे यांच्या मुलांच्या फीमध्ये सवलत मिळण्याकरीता केलेला अर्ज व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

सोलापूर विद्यापीठात मानसेवी लेखनिक म्हणून श्री. एस. आर. लोखंडे कार्यरत आहेत. त्यांचा मुलगा एम. ए. भाग २ A.I.H.C.& A. या अभ्यासक्रमास शिकत असून त्यांना रु.३०००/- इतके मानधन विद्यापीठाकडून मिळते. या अपुऱ्या मानधनामुळे प्रपंच व मुलांच्या शिक्षणाचा खर्च भागविणे अडचणीचे होत असून मुलाच्या फीमध्ये सवलत मिळावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे. (सोबत त्यांचा अर्ज).

दि. २२ जुलै २००४ रोजीच्या शासनाच्या अधिसूचनेनूसार शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचे नियम व परिनियम सोलापूर विद्यापीठास जोपर्यंत सोलापूर विद्यापीठ स्वत:चे नियम व परिनियम तयार करीत नाही तोपर्यंत तेच नियम व परिनियिम सोलापूर विद्यापीठास लागू राहतील. कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना फीमध्ये सवलत देण्याबाबत कोणताही नियम प्रचलित व अस्तित्वात नाही. तेव्हा सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव क्र. [ ५ ]** **मानसेवी लेखनिक श्री. एस. आर. लोखंडे यांच्या मुलाच्या फीमध्ये सवलत मिळण्याबाबतच्या प्रस्तावावर मा.कुलगुरु यांनी त्यांच्या अधिकारात निर्णय घ्यावा, असे ठरले.**

**विषय क्र. [ ६ ]** **महाराष्ट्र शासनाने दैनिक भत्याच्या दरात सुधारणा केल्याचा शासन निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. प्रवास१००५/प्र.क्र.१७/सेवा-५, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दि. १९ जून २००६ अन्वये दैनिक भत्याच्या दरात सुधारणा केलेल्या असून सदरच्या सुधारणा केलेल्या दैनिक भत्याचा दर व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी आणि मान्यतेसाठी सादर. (सोबत शासन निर्णय).

**ठराव क्र. [ ६ ]** **व्यवस्थापन परिषदेने शासन निर्णयाची नोंद घेतली, आणि या अनुषंगाने विद्यापीठाच्या कामासाठी येणाऱ्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि अधिकारी यांच्या दैनंदिन भत्ता व प्रवास भत्ता अदा करण्यात येणारे दर ठरविण्यासाठी खालील समिती गठीत केली.**

**१) प्राचार्य बी. पी. रोंगे - अध्यक्ष.**
**२) डॉ. एल. पी. देशमुख - सदस्य.**
**३) श्री. व्ही. तिरुपती - सदस्य.**

**विषय क्र. [ ७ ]** **वकीलांची फी सुधारीत करण्याबाबत विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

ॲड. अशोक ठोकडे सोलापूर विद्यापीठाकडील कोर्टकेसेस व कायदेशीर बाबी पाहतात. त्यांना अदा करण्यात येणा-या कोर्टकेसेसच्या कामाच्या शिवाजी विद्यापीठाने ठरविलेल्या व त्यांच्या व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिलेल्या फीचा तक्ता सोबत जोडलेला आहे. सदरची फी अपुरी आणि कमी असल्याने सदर फी सुधारीत करावी अशी विनंती केलेली आहे. (सोबत ॲड. अशोक ठोकडे यांचे पत्र)

सबब, ॲड. अशोक ठोकडे यांच्या फीमध्ये सुधारणा करण्याबाबतचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

[कृ.मा.प.]

**ठराव क्र. [ ७ ]** **वकीलांच्या सुधारीत फीबाबत वित्त व लेखा समितीकडे विषय सादर करावा. वकीलांचे पॅनेल तयार करण्यासाठी पुढील सभेत कायद्यातील तरतूदींचा अभ्यास करुन हा विषय पुन्हा पुढील सभेत सादर करावा.**

**विषय क्र. [ ८ ]** **वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अकंपा-१००३/प्र.क्र.५९/२००३/आठ, मंत्रालय, मुंबई ३२ दि. ३० जानेवारी २००४ व महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. पअकं१०९७/१७९३/प्र.क्र.४/५८/१६-अ, मंत्रालय, मुंबई ३२ दि. १९ मार्च १९९८ सोबत जोडलेले आहे. सदर शासन निर्णयामध्ये राज्यातील शासकीय/जिल्हापरिषद/पंचायत समितीमधील वर्ग ३ व वर्ग ४ या संवर्गातील खुल्या प्रवर्गातील पदे भरण्याबाबतच्या काही तरतूदी करण्यात आल्या आहेत. सदरच्या तरतूदीचे आदेश विद्यापीठाला लागू करावेत अशी मागणी मा. राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांच्याकडे श्री. बाळासाहेब पाटील, संपर्कप्रमुख, पश्चिम महाराष्ट्र अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटन, महाराष्ट्र यांनी केलेली आहे. मा.कुलपती कार्यालयाने योग्य त्या कार्यवाहीसाठी त्यांचे पत्र व शासन निर्णय विद्यापीठाकडे पाठविलेले आहे. सदरची बाबीवर धोरणात्मक निर्णय होण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. [ ८ ]** **वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्याबाबतचे शासनाचे परिपत्रक विद्यापीठास लागू नाही.**

**विषय क्र. [ ९ ]** **बहि:स्थ विभागाकडील विद्यार्थ्यांचे अर्ज, अर्जाची छाननी, त्रुटींची पूर्तता, त्यांच्या पात्रता, परीक्षेची आसन व्यवस्था, परीक्षा - प्रवेश- ओळखपत्रे, त्यांचे निकाल, गुणपत्रिका, प्रमाणपत्र इ. कामे "महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित" (MKCL) यांच्याकडून करुन घेण्याबाबतचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

सोलापूर विद्यापीठाकडील बहि:स्थ विभागाकडे सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षामध्ये अंदाजे ३००० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. विद्यापीठाकडे पुरेसा मनुष्यबळाअभावी बहि:स्थ विभागाची सर्व कामे वेळेत पूर्ण करणे शक्य होत नाही. बहि:स्थ विद्यार्थ्यांचे अर्ज, अर्जाची छाननी, त्रुटींची पूर्तता, त्यांच्या पात्रता, परीक्षेची आसन व्यवस्था, परीक्षा-प्रवेश-ओळखपत्रे, त्यांचे निकाल, गुणपत्रिका, प्रमाणपत्र इ. कामे करावी लागतात.

प्रतिवर्षी प्रत्येक विद्यार्थ्यामागे रु.१००/- इतके शुल्क आकारुन बहि:स्थ विद्यार्थ्यांची संपूर्ण प्रवेश प्रक्रियेपासून प्रमाणपत्र मिळेपर्यंतची सर्व सेवा देण्यासाठी 'महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित' (MKCL) यांनी तयारी दर्शविलेली आहे तसेच बहि:स्थ विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी आवश्यक ती सर्व माहिती संकेतस्थळावर २४ तास उपलब्ध करुन देण्याचीही त्यांनी तयारी दर्शविलेली आहे. सोबत 'महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित' (MKCL) यांच्याबरोबर करावयाच्या सामंजस्य कराराची प्रत जोडलेली आहे.

सदरची बाब धोरणात्मक असल्याने व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. [ ९ ]** **महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (MKCL) रु.५०/- प्रत्येक विद्यार्थ्यांस**

**[कृ.मा.प.]**

**आकारुन त्यांच्या प्रस्तावाप्रमाणे सेवा देण्यास तयार असल्यास महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (MKCL) यांच्याबरोबर बहि:स्थ विभागाच्या कामाबाबत सामंजस्य करार करण्यात यावा.**
**हा प्रस्ताव महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (MKCL) यांना मान्य न झाल्यास विद्यापीठाने बहि:स्थ विभागासाठी स्वतंत्र यंत्रणा उभा करावी.**

**विषय क्र. [ १०] उच्च व तंत्र शिक्षण विभागातंर्गत येणाऱ्या विविध शैक्षणिक संस्थांमार्फत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना "ई-सुविधा" उपलब्ध करुन देण्याबाबतचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

विद्यार्थ्यांना ई-सुविधेतंर्गत त्यांच्या प्रवेशासाठी लागणाऱ्या माहितीपासून पदवी/पदविका प्रदान करेपर्यंत आणि विविध संस्था त्यामधील अभ्यासक्रम शिष्यवृत्त्या, अन्य सवलतीचे अर्ज, विविध शासकीय योजना लाभार्थी विद्यार्थ्यांचे अर्ज, स्पर्धा परीक्षा अर्ज, परीक्षांची वेळापत्रके, मागील वर्षातील प्रश्नपत्रिका, गुणपत्रके, प्रमाणपत्रे तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शहरी भागातील विद्यार्थ्यांप्रमाणे सुविधा उपलब्ध करुन देणे इ. बाबतीत महाराष्ट्र शासनाने निर्णय घेतलेला असून सन २००६-०७ पासून विद्यार्थ्यांना ई-सुविधा 'महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित' (MKCL) यांच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने आदेश निर्गमित केले आहे. (सोबत प्रत). त्यासाठी प्रतिवर्षी प्रतिविद्यार्थी रु.५०/- 'ई-सेवा शुल्क' म्हणून आकारण्याबाबत शासनाने उपरोक्त आदेशान्वये सुचविले आहे.

संबंधित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकडून जमा होणारी "ई-सेवा शुल्क" सुरुवातीला विद्यापीठाकडे जमा करुन (जमा झालेल्या महिन्याच्या) पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत विद्यापीठाने प्रतिविद्यार्थी रु.५०/- प्रमाणे 'महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित' (MKCL) यांच्याकडे प्रत्यक्ष जमा करावी अशीही सूचना केलेली असून सदरच्या योजनेच्या अंमलबजावणीसंदर्भात तपशीलासह सामंजस्य करार करुन करारातील अटी व तरतूदीनुसार योजनेची अंमलबजावणी करावी आणि सदरचा सामंजस्य करार त्यामधील अटी व तरतूदींच्या माहितीसह सर्व संबंधित शैक्षणिक संस्था व महाविद्यालये यांना कळवावे तसेच सदरची संपूर्ण प्रक्रिया रीतसर व पारदर्शी तसेच करारातील विविध पध्दतीनुसार राबविण्याची जबाबदारी सर्व संबंधित संस्था/महाविद्यालये/संबंधित अधिकारी यांच्यावर राहील असेही करारात नमूद केलेले आहे. सोबत शासनाकडून आलेला 'महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित' (MKCL) बरोबर करावयाच्या सामंजस्य कराराची प्रत जोडली आहे.

सदरची बाब धोरणात्मक असल्याने व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. [ १०] उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक : ईसेवा२००६/(१९९/०६)/ मशि-१, दि.१९ जून, २००६ अनुसार विद्यापीठातंर्गत विविध शैक्षणिक संस्थांमार्फत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना "ई-सुविधा" उपलब्ध करुन देण्याबाबतच्या प्रस्तावास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. [ ११] दि. २७/१२/२००५ रोजी दुपारी १-०० वा. झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेतील उपविभागीय विज्ञान केंद्राच्या उभारणीसाठी विद्यापीठाची ५ एकर जागा सोलापूर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबतचा विषय क्र. २५ वरील ठरावात बदल करण्याबाबत.**

सोलापूर विद्यापीठामध्ये (पूर्वीचे शिवाजी विद्यापीठाचे सोलापूर येथील उपकेंद्र) उपलब्ध असलेल्या जागेवर उपविभागीय विज्ञान केंद्रास ५ एकर जागा सोलापूर महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत दि. २७/१२/०५ रोजी दुपारी १-०० वा. व्यवस्थापन परिषदेच्या झालेल्या सभेत ठराव करण्यात आलेला होता (सोबत प्रत).

डॉ. ए. व्ही. सप्रे, सदस्य सचिव, राजीव गांधी सायन्स आणि टेक्नॉलॉजी कमिशन मंत्रालय मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र. २१/७/०६ अन्वये (सोबत पत्र जोडलेले आहे). सदरची ५ एकर जागा विज्ञान केंद्राकडे आणि महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याची आवश्यकता नाही. उपविभागीय विज्ञान केंद्राची उभारणी विद्यापीठ आणि महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने (JOINT VENTURE) विद्यापीठाच्या जागेवर सुरु होणार आहे. त्यासाठी या संस्थेमध्ये (JOINT VENTURE) करुन उपविभागीय विज्ञान केंद्र सुरु करावे असे कळविलेले आहे.

सबब, व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ आणि मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. [ ११] डॉ. ए. व्ही. सप्रे, सदस्य सचिव, राजीव गांधी सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी**

**कमिशन, मंत्रालय, मुंबई यांच्या पत्रातील प्रस्तावानुसार उपविभागीय विज्ञान केंद्रास ५ एकर जागा हस्तांतरीत करण्याची आवश्यकता नसल्याने विद्यापीठाची पाच एकर जागा शासनाची मान्यता घेऊन हस्तांतरीत करण्याऐवजी उपविभागीय विज्ञान केंद्राची उभारणी, उपविभागीय विज्ञान केंद्र, सोलापूर विद्यापीठ आणि सोलापूर महानगरपालिका यांच्यामध्ये संयुक्त उपक्रम (JOINT VENTURE) करण्यास मान्यता दिली.**

विषय क्र. [ १२] **सोलापूर विद्यापीठाचा सन २००५-०६ चा वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

सोलापूर विद्यापीठाचा सन २००५-०६ चा वार्षिक अहवाल तयार करण्याकरीता नियुक्त केलेल्या समितीने वार्षिक अहवाल तयार केलेला असून सोबत त्याची प्रत जोडली आहे.

सबब, सदरचा विषय महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १०४ नुसार आणि कलम २८ (cc) नुसार व्यवस्थापन परिषदेपुढे मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक असल्याने हा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ आणि मान्यतेसाठी सादर.

ठराव क्र. [ १२] **सोलापूर विद्यापीठाचा सन २००५-०६ च्या वार्षिक अहवालामध्ये ज्या सदस्यांना दुरुस्त्या सुचवावयाच्या आहेत त्यांनी लेखी स्वरुपात दि.२० ऑक्टोबर २००६ पूर्वी कार्यालयाकडे सादर कराव्यात त्या सुचनांचा विचार करुन सदरचा अहवाल अंतिम करावा असे ठरले.**

विषय क्र. [ १३] **विद्यापीठातील व महाविद्यालयातील नवीन अभ्यासक्रमाच्या विविध विषयासाठी सुधारीत शुल्क आकारण्याबाबतच्या व्यवस्थापन व विद्यापरिषद यांच्या संयुक्त समितीने शिफारस केलेला सुधारीत शुल्क स्वीकारण्याचा प्रस्ताव विचारार्थ...**
**(सोबत समितीचा अहवाल जोडलेला आहे.)**

(टिपणी : विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमासाठी सुधारित शुल्काबाबतचा निर्णय घेण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या दि.27/3/2006 रोजीच्या बैठकीत विषय क्र. 7 अन्वये समिती गठीत करणेबाबत विचारार्थ ठेवला होता. व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र.7 अन्वये प्राचार्य जे. के. बिले, डॉ. पी. जी. मोरे, डॉ. डी. डी. रणनवरे यांची समिती गठीत केलेली होती. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा 1994 अन्वये सदर शुल्काचा प्रस्ताव हा विद्यापरिषदेकडून व्यवस्थापन परिषदेस शिफारस होणे गरजेचे होते. त्यानुसार विद्यापरिषदेच्या दि.30-06-2006 रोजीच्या बैठकीमध्ये विषय क्र.44 अन्वये विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमासाठी सुधारित शुल्काबाबतचा प्रस्ताव विचारार्थ ठेवण्यात आला होता. विद्यापरिषदेमध्ये विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमासाठी सुधारित शुल्काबाबतच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन विद्यापरिषदेमधील सदस्यांमधून मूळ समितीमध्ये प्राचार्य के. एम. जमादार आणि प्रा. श्री. एस. के. मठपती यांचा समावेश करण्यात आला. त्यानुसार विद्यापरिषद व व्यवस्थापन यांच्या संयुक्त समितीने यावर सखोल अभ्यास करुन सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे सुधारित शुल्काचा आराखडा तयार केलेला आहे.

सदरची समिती खालीलप्रमाणे तयार झाली.

1. प्राचार्य बिले जे. के. (अध्यक्ष)
2. डॉ. पी. जी. मोरे (सदस्य)
3. डॉ. रणनवरे डी. डी. (सदस्य)
4. प्राचार्य के. एम. जमादार (सदस्य)
5. श्री. मठपती एस. के. (सदस्य)

सदर शुल्काबाबत समितीने केलेल्या शिफारशी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा 1994 कलम 30(2)(q) अन्वये विद्यापरिषदेने व्यवस्थापन परिषदेकरिता शिफारस करणे आवश्यक आहे. सबब विद्यापरिषदेच्या दि. 30/6/2006 च्या बैठकीच्या ठराव क्र. 44 अन्वये सदरच्या समितीच्या अहवालावरती कार्यवाही करण्याचा अधिकार मा.कुलगुरु

यांना देण्यात आलेला आहे. सदर अधिकाराच्या अन्वये मा.कुलगुरु यांनी समितीचा अहवाल स्विकारुन तो व्यवस्थापन परिषदेच्या मंजूरीकरिता शिफारस केलेली आहे. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ठराव क्र. [ १३] **पान क्र. २५४ वर, Regular student म्हणजे with guide आणि independent student म्हणजे without guide आणि पान क्र. २५८ वर, अ.क्र. ८ विजयसिंह मोहिते महाविद्यालय नातेपुते येथे Tution Deposit ऐवजी Tution Fees अशी दुरुस्ती करुन समितीचा अहवाल मंजूर करण्यात आला.**
**ज्या संस्थांनी त्यांनी सुरु केलेला संबंधीत अभ्यासक्रमासाठीचे शुल्क ठरविण्याचे प्रस्ताव सादर केलेले असतील ते शुल्क समितीपुढे सादर करुन शुल्क रचना ठरवावी. ज्या अभ्यासक्रमाचे शुल्क निश्चित केलेले आहे ते संबंधित महाविद्यालयामध्ये सुरु असलेल्या किंवा सुरु होणाऱ्या अभ्यासक्रमांना लागू राहील तसे संबंधित महाविद्यालयांना/संस्थांना कळवावे.**

विषय क्र. [ १४] **ग्रंथालय समितीच्या सभेचे ठराव व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

दि. ४/९/०६ रोजी ग्रंथालय समितीची सभा झाली. या सभेमध्ये झालेले ठराव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा (xxxv) -1994.75.C.iii आणि iv अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

ठराव क्र. [ १४] **ग्रंथालय समितीच्या दि. ४/९/०६ रोजी झालेल्या सभेच्या कार्यवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

विषय क्र. [ १५] **डॉ. सुभाष ज्ञा. कदम, प्राचार्य दलित मित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेज, मंगळवेढा यांच्या प्राचार्य पदाच्या नेमणूकीला दिलेली मान्यता मागे का घेवू नये? याबाबत द्यावयाच्या नोटीसीच्या मसूद्याला मंजूरी देण्याबाबत विचारार्थ. (नोटिसीचा मसूदा सोबत जोडलेला आहे.)**

टिपणी : १. प्राचार्य, दलित मित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेज, मंगळवेढा हे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २७/३/२००६ चया बैठकीतील ठराव क्र. ९ (ब) व (क) ची अंमलबजावणी करत नाहीत.

२. प्राचार्य विद्यापीठाने वेळोवेळी दिलेले आदेश पाळत नाहीत. (परिशिष्ट अ)

३. मा. संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर आणि शासन नियुक्त प्रशासक दलित मित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेज, मंगळवेढा यांच्या आदेशांचे पालन करत नाहीत. (परिशिष्ट ब)

४. दि.२९/६/२००६ रोजी मा.कुलगुरुंच्या दालनात मा.कुलगुरुंच्या उपस्थितीत मा.संचालक उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग कोल्हापूर, प्रशासक दलित मित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेज, मंगळवेढा व अध्यक्षा शिक्षण प्रसारक मंडळ, संचालक शिक्षण प्रसारक मंडळ, प्राचार्य, संचालक महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ आणि कुलसचिव यांच्या संयुक्त बैठकीत पारित केलेल्या कार्यवृत्तांताची अंमलबजावणी आज तागाईत केली नाही. (परिशिष्ट क)

५. दि.२९/६/२००६ रोजी अध्यक्षा, शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा आणि सचिव (प्राचार्य स्वत: सचिव आहेत.) यांनी रु.१००/- च्या स्टॅम्पवर मान्य केलेल्या बाबींची अंमलबजावणी करत नाहीत. (परिशिष्ट ड)

६. प्रशासक दलित मित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेज, मंगळवेढा, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग कोल्हापूर, यांनी प्रशासक नियुक्त सहा कर्मचाऱ्यांसह माहे मे, जून व जुलै २००६ चे वेतन प्राचार्यांच्याकडे वितरीत करण्यासाठी पाठविले होते परंतु सदर महिन्याचे वेतन बँकेत जमा करताना प्रशासक नियुक्त कर्मचाऱ्यांचे वेतन वगळून प्राचार्यांनी ते बँकेकडे पाठविलेले आहे. बँकेचे पत्र क्र. एमजीडब्ल्यू/एसपीएस/ ३७/१९५ दि. २२/८/२००६ (परिशिष्ट इ)

७. त्यांच्या कॉलेजच्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे माहे मे, जून व जुलै २००६ अखेरचे वेतन, वेतन अनुदान जमा होऊन सुध्दा वितरीत केलेले नाही. त्यामुळे त्या कर्मचाऱ्यांची आर्थिक कोंडी झालेली आहे. याचा परिणाम म्हणून त्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या दि.३/८/२००६ च्या संयुक्त निवेदनाद्वारे दि.१०/८/२००६ पासून विद्यापीठामध्ये चक्री उपोषण करण्याचा निर्णय घेतलेला होता. परंतु विद्यापीठाच्या पत्र क्र. सोल/युटीवाय/ॲफी/७३०/३०१७ दि.८/८/२००६ ला प्रतिसाद

**[कृ.मा.प.]**

देऊन ते आंदोलन त्यांनी तात्पुरते स्थगित ठेवलेले आहे. संबंधित महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्याने दि.१४/८/२००६ रोजी आंदोलन स्थगित करीत असल्याबाबत कळविले.विद्यापीठाने ही बाब दि.२४/८/२००६ रोजी मा.संचालक (उच्च शिक्षण) पुणे यांना कळविले आहे.(परिशिष्ट ई)

८. विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण कोल्हापूर विभाग कोल्हापूर यांनी त्यांचा पत्र क्र. शिससं/उशि/४३६९/७० दि.१०/८/२००६ व पत्र क्र. शिससं/उशि/कोवि/४३६६-६८ दि.१०/८/२००६ ने प्राचार्यांच्यावर विद्यापीठ परिनियमानुसार कारवाई करणेबाबत कळविलेले आहे. (परिशिष्ट उ)

या सर्व घटनांवरुन, विद्यापीठ प्रशासन या निर्णयापर्यंत आलेले आहे की, प्राचार्यांच्या नेमणूकीला विद्यापीठाने दिलेली मान्यता मागे घेणे उचित होईल.

महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ च्या कलम ५३ अंतर्गत तयार केलेल्या Ordinances No. 43 मध्ये प्राचार्यांच्यावर कारवाई करणेबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

"If a Principal/Head of the Institution is found guilty of repeatedly violation/failing to comply with provision of the Act, Statutes, ordinances, rules & regulations and/or directives by the Vice-Chancellor/the University, the Management Council may withdraw the approval of the Principal/Head of the Institution.

Provided that, while withdrawing the approval of the Principal/Director, full opportunity should be given to them to defend their case.

तेव्हा, प्राचार्यांना लागू करावयाच्या प्राचार्यपदाची मान्यता मागे घेण्याच्या नोटीसीचा मसूदा मंजूरीसाठी विचारार्थ).

**ठराव क्र. [ १५]** **दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा येथील डॉ. सुभाष कदम यांच्या पदाच्या नेमणूकीला दिलेली मान्यता काढून घेण्यासंदर्भात देण्यात यावयाच्या नोटीसीसंदर्भातील विषयाबाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २८ (dd) नुसार, या विषयाचा सखोल अभ्यास व चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी खालील समिती गठीत करण्यात आली.**

**१) ॲड. रामदास पी. सब्बन - अध्यक्ष.**
**२) प्राचार्य जे. के. बिले - सदस्य.**
**३) डॉ. सी. बी. कोळेकर - सदस्य.**
**४) डॉ. एल. पी. देशमुख - सदस्य.**
**५) श्री. एन. बी. पवार - सदस्य.**
**६) सौ. एन. व्ही. साठे - सदस्या.**
**७) डॉ. आर. आर. पाटील संचालक म. व वि. वि. मं. - सचिव.**

**या समितीने चार आठवडयात विद्यापीठाकडे अहवाल सादर करावा.**

**विषय क्र. [ १६] विद्यापीठातील स्वावलंबी तत्त्वावर चालणारे विभाग आणि विविध अभ्यासक्रम, त्यांची प्रवेशक्षमता, प्रत्यक्षात किती विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले, पहिले वर्ष, दुसरे वर्ष, सदरच्या विभागाचे उत्पन्न व खर्च, शिक्षक / शिक्षकेत्तर वर्ग आणि इतर सुविधा इत्यादी बाबींचा विचार करुन अहवाल सादर करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.**

**ठराव क्र. [ १६]** **विद्यापीठातील स्वावलंबी तत्त्वावर चालणारे विभाग आणि विविध अभ्यासक्रम, त्यांची प्रवेशक्षमता, प्रत्यक्षात किती विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले, पहिले वर्ष, दुसरे वर्ष, सदरच्या विभागाचे उत्पन्न व खर्च, शिक्षक / शिक्षकेत्तर वर्ग आणि इतर सुविधा इत्यादी बाबींचा विचार करुन अहवाल सादर करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेने मान्य केला.**

**विषय क्र. [ १७] महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ५० (२) (अ) नुसार, स्थायी समितीवर अधिसभेतून नामनिर्देशित करावयाचे ४ सदस्य ज्यापैकी**

[कृ.मा.प.]

**एक अधिष्ठाता, एक शिक्षक व उर्वरित २ सदस्य यांचे आणि कलम ५० (२) (ब) नुसार, ३ सदस्यांचे व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून नामनिर्देशन करण्याबाबत ज्यापैकी एक महिला प्रतिनिधी आणि एक शिक्षक.**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ५० (२) (अ) नुसार, स्थायी समितीवर अधिसभेतून नामनिर्देशित करावयाचे ४ सदस्य ज्यापैकी एक अधिष्ठाता, एक शिक्षक व उर्वरित २ सदस्य यांचे आणि कलम ५० (२) (ब) नुसार, ३ सदस्यांचे व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून नामनिर्देशन करणे आवश्यक आहे, ज्यापैकी एक महिला प्रतिनिधी व एक शिक्षक असेल यांचे नामनिर्देशन करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

**ठराव क्र. [ १७]** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ५० (२) (अ) नुसार स्थायी समितीवर अधिसभेतून नामनिर्देशित करावयाचे ४ सदस्य खालील प्रमाणे-**
**एक अधिष्ठाता - डॉ. व्ही. जे. नाईकनवरे.**
**एक शिक्षक - श्री. एन. बी. पवार.**
**उर्वरित २ सदस्य - प्राचार्य जे. के. बिले**
**मा.जयसिंह मोहिते-पाटील**
**महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ५० (२) (अ) नुसार ३ सदस्यांचे व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून नामनिर्देशन खालील प्रमाणे**
**एक महिला - सौ. एन. व्ही. साठे.**
**एक शिक्षक - डॉ. एल. पी. देशमुख.**
**उर्वरित एक सदस्य - प्राचार्य बी. पी. रोंगे.**

**विषय क्र. [ १८] मा.कुलपती यांचे प्रतिनिधी ॲड. रामदास पी. सब्बन यांचे पत्र व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

सोबत मा. कुलपती यांचे प्रतिनिधी ॲड. रामदास पी. सब्बन यांचे पत्र जोडले असून कृपया अवलोकनी घ्यावे. या पत्रामध्ये २ मुद्दे मांडले असून ते खालीलप्रमाणे आहे.

३) भारतातील आणि परदेशातील कंपन्या, सरकार, ट्रस्ट, प्रतिष्ठित व्यक्ती यांच्याकडून निधी मिळविण्यासाठी "निधी वृध्दी समिती (Funds raising Committee)" समितीचे गठन करावे यामध्ये एक अध्यक्ष, एक चेअरमन आणि २ सदस्यांच्या समावेश असावा.

४) क्रीडा क्षेत्राशी निगडीत विविध कार्यासाठी विद्यापीठ स्टॅट्यूटप्रमाणे विद्यापीठ क्रीडा मंडळ स्थापन करावे.

मुद्दा क्र. १ बाबत, मा. कुलगुरु यांनी विद्यापीठ निधी समितीची स्थापना केलेली आहे. यामध्ये खालील सदस्यांचा समावेश आहे.

१) प्राचार्य जे. के. बिले - अध्यक्ष.
२) डॉ. बी. एस. कोनापूरे - सदस्य.
५) प्राचार्य डॉ. एस. सी. धुत्तरगांव - सदस्य.
६) प्राचार्य डॉ. ए. एल. देशमुख - सदस्य.
५) श्री. एस. के. मठपती - सदस्य.
६) डॉ. पी. बी. कुंभार - सदस्य सचिव.

मुद्दा क्र. २ बाबत, विद्यापीठ स्टॅट्यूट क्र. S-350 प्रमाणे मा.कुलगुरु यांनी क्रीडा मंडळाची स्थापना केलेली असून त्याची रचना खालीलप्रमाणे आहे.

i)The Vice-Chancellor (Chairman)
ii)Two experts in the field of sports and physical culture to be nominated by the Vice-Chancellor.
iii)Chairman, each of the zonal Councils.
iv)Two members of the Management Council nominated by the Management Council.
v)The Director of Student's Welfare.
vi)Two representatives of Directors of Physical Education nominated by the Vice-Chancellor by rotation on the basis of

seniority of Colleges.
vii)The Director of Sports shall be the Member Secretary.
The Term of office of the nominated members shall be five years.
They will however, be eligible for renomination.
क्र. १ व २ व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. [ १८]** **या विषयाची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली आणि निधी समितीमध्ये ॲड. रामदास पी. सब्बन मा.कुलपती यांचे प्रतिनिधी यांचा समावेश करण्यात आला तसेच डॉ. पुरणचंद्र पुंजाल यांना कबड्डीच्या कार्यक्रमाप्रसंगी (events) निमंत्रित म्हणून बोलवावे असे ठरले.**

**विषय क्र. [ १९]** **दि. २८/८/०६ रोजी झालेल्या खरेदी समिती (विषय क्र. ४ वगळून) व वित्त व लेखा समितीच्या सभेचे कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

दि. २८/८/०६ रोजी झालेल्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत (विषय क्र. ४ वगळून) व वित्त व लेखा समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.

**ठराव क्र. [ १९]** **दि. २८/८/०६ रोजी झालेल्या खरेदी समिती (विषय क्र. ४ वगळून) व वित्त व लेखा समितीच्या सभेच्या कार्यवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली तसेच दि.२८/८/०६ रोजी झालेल्या खरेदी समितीमधील विषय क्र. ५ मधील ठरावातील महाविद्यालयाकडून रु.१०००/- प्रोसेसिंग फी SOUL सॉफ्टवेअर खरेदी करताना आकारु नये असे ठरले.**

## मा.कुलगुरु यांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय :-

आयत्या वेळेचे विषय घेताना, प्रत्येक विषयाला वेगवेगळे क्रमांक न देता, विषयाचे उपक्रमांक द्यावेत.

**विषय क्र. [२०(१)]** **मल्टीक्लासरुम कॉम्प्लेक्स इमारतीच्या तिसऱ्या मजल्याच्या स्लॅबसाठी स्टील खरेदी करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी.**

सोलापूर महानगरपालिकेकडून प्राप्त झालेल्या रकमेतून मल्टीक्लासरुम कॉम्प्लेक्स इमारतीचे बांधकाम सुरु आहे. मल्टीक्लासरुम कॉम्प्लेक्स इमारतीच्या तिसऱ्या मजल्याच्या स्लॅबसाठी ३८ टन राहूल बिल्डर्स सांगली व विद्यापीठाचे स्ट्रक्चरल इंजिनिअर श्री. एस. पी. मोहोळकर व वास्तुविशारद श्री. यादगिरी कोंडा यांनी जास्तीचे ५ टन खरेदी करण्यास सुचविले आहे. सदरची बाब तातडीची असल्याने मा. कुलगुरु यांनी खरेदी समिती, वित्त व लेखा समिती व व्यवस्थापन परिषदेच्या वतीने ४३ टन टाटा स्टील मे. दर्गोपाटील ॲन्ड सन्स, सोलापूर यांच्याकडून खरेदी करावयाचे ४३ टन टाटा स्टीलचे दर जुने असून याची किंमती रु. १३,००,९००/- आहे. मा. कुलगुरु यांनी खरेदी समिती, वित्त व लेखा समिती व व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

**ठराव क्र. [२०(१)]** **मा.कुलगुरु यांनी केलेल्या खरेदी समिती, वित्त व लेखा समिती आणि व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

**विषय क्र. [२०(२)]** **परीक्षा नियंत्रक निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७९ (१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या**

[कृ.मा.प.]

**सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामनिर्देशनाबाबत..**

सोलापूर विद्यापीठाकडील परीक्षा नियंत्रक पद भरण्याकरिता जाहिरात दिलेली असून सदरचे पद निवडीकरीता असणाऱ्या निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७९ (१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्र. [२०(२)] परीक्षा नियंत्रक निवड समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७९ (१) (ब) (ii) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून दोन सदस्यांचे नामनिर्देशन खालीलप्रमाणे करण्यात आले.**

**३) डॉ. सी. बी. कोळेकर.**
**४) श्री. एन. बी. पवार.**

**विषय क्र. [२०(३)] सोलापूर विद्यापीठाचा सुधारित बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी..**
**(सोबत जोडला आहे.)**

टिपणी : व्यवस्थापन परिषदेच्या दि.२७/१२/०५ ठराव क्र. ५५ अन्वये सुधारित बृहत आराखडा तयार करावा असा ठराव झालेला होता. सदर ठरावाच्या अनुषंगाने महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या दि.१३/६/२००६ च्या बैठकीमध्ये प्राचार्य जे. के. बिले, डॉ. डी. डी. रणनवरे, डॉ. पी. जी. मोरे व प्राचार्य डॉ. ए. एल. देशमुख यांची सुधारित बृहत आराखडा तयार करण्यासाठी उपसमिती नेमली होती. सदर समितीने सोलापूर विद्यापीठाचा शै. वर्षे २००६-२०११ पर्यंतचा सुधारित सर्वसमावेशक असा बृहत आराखडा तयार केलेला आहे. सदरचा बृहत आराखडा महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या दि.३०/९/२००६ रोजीच्या बैठकीमध्ये मान्य करुन सदरचा सुधारित बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनंतर सदरचा आराखडा अंतिम मंजूरीसाठी शासनाकडे पाठवावा लागणार आहे. सदरचा बृहत आराखडा व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर..

**ठराव क्र. [२०(३)] बृहत आराखडा खालील दुरुस्तींसह मान्य करण्यात आला.**

**१) पान क्र. ३५३ वर d) B.B.A./B.C.A. आहे यात Biotechnology & BCS चा समावेश करावा.**

**२) पान क्र. ३५५ वर, a) Arts & Commerce College आहे यामध्ये B.C.A. चा समावेश करावा.**

**३) पान क्र. ३६० वर, v) Master of Social Welfare (M.S.W.) ऐवजी Master in Computer Application (M.C.A.) अशी दुरुस्ती करावी.**

**विषय क्र. [२०(४)] द्वितीय दीक्षांत समारंभासाठी प्रमुख अतिथी ठरविण्याबाबत.**

(टिपणी :- सोलापूर विद्यापीठाचा द्वितीय दीक्षांत समारंभ डिसेंबर २००६/जानेवारी २००७ मध्ये घेण्याचे नियोजन आहे. या समारंभासाठी प्रमुख अतिथी ठरविण्यासाठी परीक्षा मंडळाच्या दि.३/१०/२००६ रोजी झालेल्या बैठकीमध्ये ठराव क्र. ४ अन्वये खालीलप्रमाणे नावांची शिफारस करण्यात आलेली आहे. सदरची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. (सोबत ठरावाची प्रत जोडली आहे).

३) मा. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, मा. राष्ट्रपती.
४) मा. ना. सुशीलकुमार शिंदे, केंद्रीय ऊर्जा मंत्री, भारत सरकार.
५) श्री. करणसिंग, संसद सदस्य.
६) श्री. रघुनाथ माशेलकर, संचालक सी.एस.आय.आर.
७) डॉ. भालचंद्र मुणगेकर, सदस्य नियोजन मंडळ.
८) श्री. जी. पार्थसारथी, माजी विदेश सचिव.

**[कृ.मा.प.]**

९) श्री. सॅम पित्रोडा, अध्यक्ष ज्ञान महामंडळ, भारत सरकार.
१०) श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी, माजी न्यायाधीश.
११) श्री. आण्णा हजारे, समाजसेवक.
१२) श्री. विं. दा. करंदीकर, ज्ञानपीठ विजेते.
१३) श्रीमती इंदिरा गोस्वामी, ज्ञानपीठ विजेती.

**ठराव क्र. [२०(४)]** **व्दितीय दीक्षांत समारंभासाठी प्रमुख अतिथी ठरविण्याबाबत धोरणात्मक कार्यक्रम ठरविण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीपुढे हा विषय सादर करावा असे ठरले.**

**विषय क्र. [२०(५)]** **सोलापूर विद्यापीठ कर्मचारी कल्याण निधीसाठी तयार केलेली घटना व नियमावली व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेकरीता सादर.**

दि.५ जुलै २००६ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेतील विषय क्र.८ वरील ठरावानुसार सोलापूर विद्यापीठ कर्मचारी कल्याण निधी समितीमध्ये डॉ. पी. जी. मोरे व डॉ. एल. पी. देशमुख यांचा समावेश करुन या समितीने दि.२२/९/२००६ रोजी सभा घेतली. या सभेत विद्यापीठ कर्मचारी कल्याण निधीची घटना व नियमावली तयार केलेली असून सदरची घटना व नियमावली व दि. २२/९/२००६ रोजी झालेल्या या समितीच्या सभेचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर.
(सोबत सभेचा कार्यवृत्तांत)

**ठराव क्र. [२०(५)]** **सोलापूर विद्यापीठ कर्मचारी कल्याण निधीसाठी तयार केलेली घटना व नियमावलीस व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. [२०(६)]** **सोलापूर विद्यापीठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर नुसार मानधन वाढ करण्याबाबत.**

(टिपणी : शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ सोलापूर जिल्हा शाखा यांचे पत्र क्र. एसयुटिए/२०/०६/३८ दि.२०.९.२००६ चे अवलकोनार्थ ठेवले आहे. या पत्रान्वये सोलापूर विद्यापीठाच्या परीक्षाच्या कामामध्ये अदा होणारे मानधन शिवाजी विद्यापीठाच्या परिपत्रक क्र. १९९ दि.१७.९.२००५ अन्वये महाविद्यालयीन शिक्षकांच्या मानधनामध्ये वाढ करण्याची मागणी केलेली आहे.

याबाबत सोलापूर विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठाने सुधारित परीक्षा फी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून घेण्यात येत आहे. तेव्हा सदरची परीक्षा फी मध्ये वाढ केली असल्याने शिक्षक संघाच्या वतीने प्रा. अशोक साळुंके, सरचिटणीस, सोलापूर जिल्हा शाखा यांनी मानधनवाढीबाबत अद्याप वाढ केली नसल्याने पूर्वलक्षी प्रभावाने वाढ करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.)

**ठराव क्र. [२०(६)]** **सोलापूर विद्यापीठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर नुसार मानधनामध्ये ऑक्टोबरपासून रु.१/- ने वाढ करण्यास व्यवस्थापन परिषदेने मान्यता दिली.**

**विषय क्र. [२०(७)]** **अभियांत्रिकी महाविद्यालय पंढरपूरचे प्राचार्य बी. पी. रोंगे यांची**

[कृ.मा.प.]

**महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळावर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ३५ (एच) नुसार केलेल्या नियुक्तीबाबत.**

अभियांत्रिकी महाविद्यालय पंढरपूरचे प्राचार्य बी. पी. रोंगे यांची महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळावर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ३५ (एच) नुसार मा.कुलगुरु यांनी व्यवसायिक महाविद्यालये प्राचार्य म्हणून नियुक्ती केलेली होती. सदरची नियुक्ती रद्द करु नये याबाबतचे मा. श्री. एन. बी. पवार व प्राचार्य बी. पी. रोंगे यांचे पत्र व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

ठराव क्र. [२०(७)] **अभियांत्रिकी महाविद्यालय पंढरपूरचे प्राचार्य बी. पी. रोंगे यांनी महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळावर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ३५ (एच) नुसार व्यवसायिक महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून केलेली नियुक्ती त्यांचा संवर्ग बदलला नसल्याने आणि त्यांची नियुक्ती कायदेशीररीत्या रद्द करता येत नसल्याने त्यांची नियुक्ती पुन्हा पूर्ववत ठेवावी असे एकमताने ठरले. याबाबतची कार्यवाही मा.कुलगुरु यांनी सत्वर करावी असे ठरले.**

**विषय क्र. [२०(८)] अधिकारी, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना विचारलेल्या खुलाश्याबाबत.**

अधिकारी, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना कुलगुरु खुलासा विचारतात. सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेपुढे विचारार्थ.

ठराव क्र. [२०(८)] **अधिकारी, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना कुलगुरु खुलासा विचारत असतात. यासंदर्भात डॉ. एल. पी. देशमुख आणि डॉ. पी. जी. मोरे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आणि मा. श्री. एन. बी. पवार यांनी विद्यापीठाच्या सुरळीत कामकाजासाठी (smooth working) अधिकारी, विभागप्रमुख व शिक्षकेतर कर्मचारी यांची कुलगुरुंनी प्रतिष्ठा, दर्जा, उच्चता आणि dignity जपण्यासाठी लेखी पत्रे देवू नयेत व खुलासे मागवू नयेत तसेच यापूर्वी कुलगुरुंनी कुलसचिव, संचालक म. व. वि. वि. मं., विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना दिलेली पत्रे रद्द करण्यात यावीत. यास सर्व व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी मान्यता दिली.**

मा.कुलसचिव यांनी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे आभार मानून मा.कुलगुरु यांच्यावतीने सभा संपल्याचे जाहीर केले.

**सही/-**
**डॉ. आय. एस. स्वामी**
**अध्यक्ष.**

**[कृ.मा.प.]**